# Washim District Police

**Nature of Work** :- **Arresting Gamblers**

**Police Station** :- **Local Crime Branch**

**Date of Good Work done** :- **22/12/2022**

**Brief of the work done :-**

एकाच दिवशी जुगाराच्या कारवायांमध्ये 28 आरोपींसह 23 लाखांचा मुद्देमाल जप्त.

लोकमत

## एकाच दिवशी तीन जुगारावर पोलिसांचे छापे; २८ आरोपींसह २३ लाखांचा मुद्देमाल जप्त

### वाशिम व मंगरुळपीत तालुक्यातील प्रकार; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** पोलिस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली २० डिसेंबर रोजी वाशिम व मंगरुळपीर तालुक्यात ३ ठिकाणी छापेमारी केली. या कारवाईत पोलिसांनी २८ आरोपींसह २३ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

पोलिस अधीक्षक बच्चन सिंह यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक भारत लसंते यांच्या पथकाने राजगाव फाट्यानजीक धाब्याजवळ कारवाई करत तब्बल २३,२५,०१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिस स्टेशन वाशिम ग्रामीण हद्दीतील राजगाव फाट्यावरील अण्णाजी धाब्याच्या बाजूला असलेल्या टीनशेडमध्ये पैशांच्या



हारजीतचा जुगार खेळत असलेल्या इसमांवर धाड टाकत त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ४७,१९५ रुपये नगदी, १२ मोबाइल संच अंदाजे किंमत ७२,२०० रुपये, घटनास्थळावरून नगदी ९,५२० रुपये व ०७ मोबाइल संच अंदाजे किंमत ३६,००० रुपये, ४६ मोटारसायकली किंमत अंदाजे १७,४५,००० रुपये, एक टाटा सफारी कार किंमत अंदाजे ४,००,००० रुपये व जुगार साहित्य ताशपत्ते अंदाजे किंमत रुपये १०० असा एकूण २३,२५,०१५/- रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.

तसेच सहायक पोलिस निरीक्षक प्रमोद इंगळे, स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम यांच्या पथकाने शेलूबाजार, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम येथील जुगार अड्ड्यावर धाड टाकून ५ आरोपींसह ५,५३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला, तर सहायक पोलिस निरीक्षक अतुल मोहनकर, स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम यांच्या पथकाने महात्मा फुले मार्केट, वाशिम येथील जुगार अड्ड्यावर धाड टाकून ६ आरोपींसह ५,८७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. अशा प्रकारे ३ कारवायांमध्ये एकूण २८ आरोपींव कारवाई करत त्यांच्याकडून एकूण २३.३६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलिस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली सोमनाथ जाधव, पोलिस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम, सपोनि भारत लसंते, सपोनि. अतुल मोहनकर, सपोनि. प्रमोद इंगळे यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली. नागरिकांनी अवैध धंद्यांबाबतची गोपनीय माहिती नियंत्रण कक्ष, वाशिम किंवा डायल ११२ यांना द्यावी, त्यांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे आवाहन वाशिम जिल्हा पोलिस दलातर्फे करण्यात येत आहे.

#### वाशिम शहरातही चालताहेत अवैध धंदे

वाशिम शहरातील काही भागामध्ये अवैध धंदे सुरु असून याकडे सुध्दा पोलीस विभागाने लक्ष देऊन कारवाई करावी व या अवैध धंद्यांमध्ये गुरफटलेल्या न्याय देणे गरजेचे आहे. पोलीस विभागाने केलेल्या या कारवाईचे कौतूक होत आहे.